**नमुना १**
**(नियम ३ पहा)**

# निवडणूकीची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की :-

१. महाराष्ट्र विधान परिषदेसाठी कोकण पदवीधर मतदार संघातून एका सदस्य पदासाठी निवडणूक घ्यावयाची आहे;

२. नामनिर्देशनपत्रे उमेदवाराला किंवा त्यांच्या कोणत्याही सूचकाला, निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य), कोकण विभाग यांचेकडे दिनांक २२ मे २०२४ (बुधवार) पर्यंत कोणत्याही दिवशी (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, पहिला मजला, कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथे दाखल करता येतील;

३. नामनिर्देशनपत्रे वर उल्लेख केलेल्या ठिकाणी व वेळी मिळू शकतील;

४. नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक २४ मे २०२४ (शुक्रवार) रोजी सकाळी ११.०० वाजता विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, पहिला मजला, कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ येथे करण्यात येईल;

५. उमेदवारी मागे घेण्याबद्दलची सूचना उमेदवाराला किंवा त्यांच्या कोणत्याही सूचकाला किंवा उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेल्या निवडणूक प्रतिनिधीला वरील परिच्छेद २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात दि. २७ मे २०२४ (सोमवार) रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत देता येईल;

६. निवडणूक लढविली गेल्यास, दि. १०/०६/२०२४ (सोमवार) रोजी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत मतदान घेण्यात येईल.

**ठिकाण :- कोकण भवन, नवी मुंबई**
**दिनांक :- १५/०५/२०२४**

(पी. वेलरासू)
निवडणूक निर्णय अधिकारी,
कोकण पदवीधर मतदार संघ तथा
विभागीय आयुक्त, कोकण विभाग